आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
१८ एप्रिल २०२४ - गुरुवार

**<u>नारायण राणे/पीटीसी/नेहा</u>**

रत्नागिरी- सिंधुदुर्ग मतदारसंघासाठी भाजपानं नारायण राणे यांना उमेदवारी जाहीर केली आहे. त्यानंतर कणकवलीत भाजपच्या कार्यालयाजवळ आणि पटवर्धन चौक इथं भाजपा आणि महायुतीच्या कार्यकर्त्यांनी जोरदार जल्लोष केला. नारायण राणे उद्या रत्नागिरी इथं आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत.

या मतदारसंघासाठी शिवसेनेचे उमेदवार किरण सामंत यांनी देखील दावा केला होता. मात्र महायुतीत तेढ निर्माण होऊ नये म्हणून किरण सामंत यांनी रत्नागिरी- सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघातून माघार घेतल्याची माहिती मंत्री उदय सामंत यांनी बातमीदारांशी बोलताना दिली.

राणे यांची लढत महाविकास आघाडीचे विनायक राऊत यांच्याबरोबर होणार आहे.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीसाठीच्या चौथ्या टप्प्याची अधिसूचना आज जारी झाली.

या टप्प्यात राज्यात नंदूरबार, जळगाव, रावेर, जालना, संभाजीनगर, मावळ, पुणे, शिरुर, अहमदनगर, शिर्डी आणि बीड या अकरा मतदारसंघात १३ मे रोजी मतदान होणार आहे.

उमेदवारी अर्ज २५ एप्रिलपर्यंत भरता येणार असून २६ एप्रिलला अर्जांची छाननी होईल. २९ एप्रिलपर्यंत उमेदवारांना आपले अर्ज मागे घेता येतील.

<><><><>

सातारा लोकसभा मतदार संघासाठी उदयनराजे भोसले यांनी आज भाजपाच्या वतीनं आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. बारामतीमधून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटातर्फे सुप्रिया सुळे यांनी देखील आज आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. महायुतीच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांनी देखील बारामतीमधून आपला अर्ज दाखल केला. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस हे देखील उपस्थित होते. सोलापूर लोकसभा मतदार संघासाठी प्रणीती शिंदे यांनी काँग्रेच्या वतीनं आपला अर्ज आज दाखल केला. लातूरचे भाजापाचे उमेदवार सुधाकर श्रृंगारे यांनी भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.

सांगली मतदार संघात भाजपा उमेदवार संजयकाका पाटील यांनी अर्ज दाखल केला.

<><><><>

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात उद्या राज्यातल्या ५ मतदारसंघांमध्ये मतदान होणार आहे. एकूण ९७ उमेदवार निवडणुकीच्या

रिंगणात असून मुख्य लढत महायुती विरुद्ध महाविकास आघाडी यांच्यात पाहायला मिळेल.

**<><><><><>**

पहिल्या टप्प्यातल्या मतदानासाठी निवडणूक यंत्रणा सज्ज झाली असून १० हजार ६५२ मतदान केंद्र उभारण्यात आल्याची माहिती राज्य निवडणूक आयोगानं दिली आहे. मतदानासाठी चोख सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली आहे. नक्षलग्रस्त गडचिरोलीत ड्रोनद्वारे देखरेख ठेवली जात आहे तसंच या मतदानासाठी सुरक्षा सैनिक तैनात करण्यात आले आहेत.

गडचिरोलीचे जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी संजय दैने यांनी मतदारांना आवाहन केलं आहे.

**होल्ड बाईट**

भंडारा गोंदिया लोकसभा मतदारसंघात उद्या मतदान होत असून यासाठी जिल्हा निवडणूक यंत्रणा सज्ज झाली आहे. मतदार संघात २ हजार १३३ मतदान केंद्र आहेत.

**<><><><><>**

राज्यातल्या उद्याच्या मतदानाचा आढावा घेणारा ‘मतदानाचा मागोवा’ हा विशेष रेडिओ ब्रिज कार्यक्रम आकाशवाणी मुंबईच्या प्रादेशिक वृत्तविभागातर्फे उद्या सादर करण्यात येणार आहे. उद्या संध्याकाळी सव्वा

आठ वाजता आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

<><><><><>

उद्योगपती राज कुंद्राच्या ९८ कोटी रुपयांची मालमत्तेवर ईडी नं अर्थात सक्तवसुली संचालनालयाने टाच आणली आहे. यामध्ये त्यांच्या आणि त्यांची पत्नी शिल्पा शेट्टी यांच्या मालकीच्या निवासी सदनिका आणि समभागांचा समावेश आहे.  मुंबई तसंच दिल्ली पोलिसांनी राज कुंद्रा याच्या विरोधात दाखल केलेल्या अनेक गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर ही कारवाई करण्यात आली असून अवैध मार्गानं ६ हजार ६०० कोटी रुपये जमवले असल्याचा त्याच्यावर आरोप आहे. राज कुंद्रानं युक्रेनहून २८५ बिटकॉईन्स देखील अवैध मार्गानं जमवलं असल्याचं ईडीच्या तपासात निष्पन्न झालं आहे.

<><><><><>

चित्रपट अभिनेता सलमान खान याच्या घरावर झालेल्या गोळीबार प्रकरणी महाराष्ट्र पोलिस अनमोल बिश्नोईच्या विरोधात  लुकआऊट नोटीस जारी करणार आहे. अनमोल हा कुख्यात गुंड लारेंस बिश्नोई याचा भाऊ आहे. त्याच्या विरोधात ठोस पुरावे मिळाल्यानंतर पोलिसांनी त्याला

सहआरोपी घोषित केलं आहे. अनमोल सध्या परदेशात असून आरोपींनी त्याच्याशी इंटरनेट दूरध्वनीच्या माध्यमातून संभाषण केलं होतं.

**<><><><><>**

**<u>आयपीएल</u>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज पंजाब किंग्ज आणि मुंबई इंडियन्स यांच्यात सामना होणार आहे. पंजाब इथल्या महाराजा यादवेंद्र सिंग आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर संध्याकाळी साडे सात वाजता हा सामना सुरू होईल.

**//<><><><><>//**